# मी ‘अम्मू स्वामिनाथन’ बोलतेय!



मी आहे अम्मू स्वामिनाथन.

एक छोटीशी गोष्ट सांगून सुरुवात करते... एकदा मी नवऱ्याला विचारलं, “कोणती साडी नेसू?” तेवढ्यात माझ्या आजीनं मला फटकारलं – “अशी कशी माझी नात गं तू?”

त्या दिवशी मला समजलं – प्रश्न साडीचा नव्हता. प्रश्न होता निर्णयाचा. बायकोनं कोणती साडी नेसायची हे नवऱ्यानं का ठरवावं? स्त्रीनं स्वतःचे निर्णय स्वतः घ्यायला शिकायला हवं. त्या एका फटकाऱ्यानं माझ्या आयुष्याचा मार्ग ठरवला.

माझा जन्म २२ एप्रिल १८९४ रोजी केरळमधल्या पालघाटमध्ये झाला. घरची परिस्थिती साधी. शाळेत जाण्याची संधी मिळाली नाही. पण वडिलांनी मला घरातच मल्याळम शिकवलं. लहानपणापासून मी थोडी धाडसी आणि जिज्ञासू होते.

वयाच्या अवघ्या १४व्या वर्षी माझं लग्न सुब्बारामा स्वामिनाथन यांच्याशी झालं. पण मी काही अटी घातल्या – आपण मद्रासला जाऊ, मला इंग्रजी शिकायचं आहे... आणि मला “घरी कधी परत येणार?” हा प्रश्न विचारायचा नाही! त्या काळात एका मुलीनं अशा अटी घालणं म्हणजे बंडच होतं. पण माझ्या पतीनं त्या मान्य केल्या. त्यांनी मला टेनिस खेळायला, गाडी चालवायला प्रोत्साहन दिलं. मद्रासच्या रस्त्यावर गाडी चालवणारी स्त्री लोकांसाठी आश्चर्य होतं – पण मला ते स्वाभाविक वाटत होतं.

मी आईला विधवेच्या वेदना भोगताना पाहिलं होतं – केशवपन, पांढरं वस्त्र, अलंकारांचा त्याग. ते दृश्य माझ्या मनात खोल कोरलं गेलं. म्हणूनच मी स्त्रियांच्या हक्कांसाठी काम करायला सुरुवात केली.

१९१७ साली मी अॅनी बेझंट आणि कमलादेवी चट्टोपाध्याय यांच्यासोबत ‘वुमेन्स इंडिया असोसिएशन’ स्थापन केली. आम्ही बालविवाह, देवदासी प्रथा यांविरुद्ध आवाज उठवला. महिलांना मताधिकार मिळावा, ही मागणी केली.

१९२० मध्ये महात्मा गांधींनी स्वदेशी आंदोलन सुरू केलं आणि मी पूर्णपणे त्या चळवळीत सामील

झाले. माझ्या मुलींवरही त्याचा परिणाम झाला. माझी मुलगी लक्ष्मी सहगल पुढे नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेत अधिकारी झाली. दुसरी मुलगी मृणालिनी साराभाई कला क्षेत्रात नावारूपाला आली. मी माझ्या मुलींना एकच शिकवलं – “तुमचे निर्णय तुम्ही घ्या, मी तुमच्या पाठीशी आहे.”

१९३० साली माझे पती गेले. पण त्यांनी मृत्युपत्रात माझ्या आणि मुलींच्या हक्कांची पूर्ण काळजी घेतली. त्या काळात मुलींना संपत्तीत समान हक्क देणं हेही क्रांतिकारक होतं.

यानंतर मी पूर्णवेळ स्वातंत्र्य चळवळीत झोकून दिलं. १९४२ च्या ‘भारत छोडो’ आंदोलनात भाग घेतला आणि तुरुंगवास भोगला.

१९४६ साली मी संविधानसभेवर निवडून गेले. २४ नोव्हेंबर १९४९ रोजी मी अभिमानानं सांगितलं – “भारतीयांनी स्वतःची राज्यघटना तयार करताना महिलांना पुरुषांप्रमाणेच समान अधिकार दिले आहेत.”

तात्पुरत्या संसदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिल मांडलं. मुलींना वारसाहक्क देण्याच्या तरतुदींना जोरदार विरोध झाला. पण मी ठामपणे त्या बाजूने उभी राहिले. संसदेत काही जण स्त्रियांविषयी अवमानकारक बोलले, तर मी त्यांना थेट सुनावलं. जातिवादाबद्दल मला प्रचंड चीड होती. तुरुंगात एकदा एका कार्यकर्तीने सफाई कामगार महिलेला तिच्या जातीवरून हाक मारली. मी तडक तिच्यासमोर जाऊन म्हणाले – “मी त्या जातीची आहे. आता बोल!”

मी अगदी नेहरूंनाही त्यांच्या नावामागच्या ‘पंडित’ या उपाधीबद्दल प्रश्न विचारला. कारण मला वाटत होतं – जात ही भावना मनातून जाणीवपूर्वक काढून टाकावी लागते. स्वातंत्र्यानंतर मी लोकसभा, राज्यसभा सदस्य झाले. भारत स्काउट्स आणि गाईड्सचे नेतृत्व केलं. विविध देशांत भारताची सदिच्छा दूत म्हणून काम केलं.

माझं आयुष्य एका तत्त्वावर उभं होतं – स्त्री आणि पुरुष समान आहेत. समाज बदलला पाहिजे. अन्याय सहन करायचा नाही, आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवायचा.

जर माझ्या आयुष्याची एक ओळ सांगायची असेल, तर ती अशी – “स्वतःचे निर्णय स्वतः घ्या... आणि समाजाला अधिक न्याय्य बनवण्यासाठी धाडसानं उभं राहा.”